# लघु सिंचन विभाग, जिल्हा परिषद भंडारा.

## मुख्यमंत्री जलसंवर्धन योजना (CMJSY)

मृद व जलसंधारण विभागाअंतर्गत धोकादायक असणाऱ्या जलस्त्रोतांची/बांधकाम उपचारांची विशेष दुरुस्ती करुन पूर्ण क्षमतेने पाणीसाठा करणे, सिंचन क्षमता पुर्नस्थापित करणे व संरक्षित सिंचनाची सोय करणे तसेच विशेष दुरुस्तीनंतर पाणी वापर संस्था स्थापन करुन त्यांचेकडे देखभाल व दुरुस्ती करीता हस्तांतरीत करणे सदर कार्यक्रम हा एप्रिल २०२० ते मार्च २०२३ या कालावधीत राबविण्यात येणार आहे.

सदर योजनेअंतर्गत ० ते ६०० हेक्टर सिंचन क्षमतेचे लघु सिंचन तलाव, साठवण तलाव, माजी मालगुजारी तलाव, गाव तलाव, पाझर तलाव, माती नालाबांध, सिमेंट नालाबांध, साठवण बंधारे, कोल्हापू पध्दतीचे बंधारे, वळवणीचे बंधारे इत्यादी प्रकल्पांची विशेष दुरुस्तीची कामे करण्यात येऊन सिंचन क्षमता पुर्नस्थापित करण्यात येणार आहे. या विभागाकडील कामांचा गोषवारा खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | तालुका | आराखडयानुसार | | प्रमा/सुप्रमा नुसार | |
|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | किंमत (रु.लक्ष) | पाणी साठा (स.घ.मी) | सिंचन क्षेत्र (हेक्टर) |
| १ | ४ | ५ | ६ | ९ | १० |
| १ | भंडारा | ४ | ६६.२५ | ६०६.२० | १९५.२६ |
| २ | तुमसर | ६ | ५८.६८ | ५५६.१० | १२४.३२ |
| ३ | लाखनी | ३ | १११.८९ | ५११.०० | १४६.०० |
| ४ | साकोली | ५ | २१७.४७ | १०७०.६० | २३८.०५ |
| ५ | पवनी | ३१ | ५७३.७७ | ५०००.७४ | ९२६.३१ |
| ६ | मोहाडी | ० | ० | ०.०० | ०.०० |
| ७ | लाखांदूर | ० | ० | ०.०० | ०.०० |
| | | **४९** | **१०२८.०६** | **७७४४.६४** | **१६२९.९४** |

सदर योजनेअंतर्गत साकोली तालुक्यातील मामा तलाव बोदरा क्षतीग्रस्त कामाची दुरुस्ती भंडारा तालुक्याती लघु सिंचन तलाव डव्वा दुरुस्तीचे काम व पवनी तालुक्यातील को.प. बंधारा दुरुस्ती पिंपळगांव चे काम पुर्णत्वास आले असुन इतर कामांना प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असुन मृद व जलसंधारण विभाग, गोंदिया कडून निविदा कार्यवाही करणे सुरु आहे.

उपजिल्हा जलसंधारण अधिकारी,
जिल्हा परिषद (ल.पा.) भंडारा.

Scanned by Scanner Go

# लघु सिंचन विभाग, जिल्हा परिषद, भंडारा.

## १३००० धडक सिंचन विहीर कार्यक्रम सन २०१९ - २०२०

### टिपणी

१३००० धडक सिंचन विहीर कार्यक्रमाअंतर्गत सन २०१९ – २० या वर्षात १५०० सिंचन विहीर बांधकामांचे उद्दिष्टे देण्यात आले असुन त्यापैकी ८०० सिंचन विहीर पेंच लाभक्षेत्रातील लाभार्थ्यांकरीता प्रस्तावित आहे व ७०० सिंचन विहीरी इतर क्षेत्राकरीता प्रस्तावित आहे. त्यापैकी ९९९ लाभार्थी निवड करुन ९९९ सिंचन विहीरींना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. व ९९८ सिंचन विहीरींना कार्यारंभ आदेश देऊन ४२५ सिंचन विहीरींची कामे सुरु करण्यात आली असुन त्यापैकी २३ विहीरींची कामे पूर्ण झालेली आहेत. सिंचन विहीरींसाठी रु. ५२८.८६ लक्ष निधीची देयके प्रदान करण्यात आली आहेत. सिंचन विहीरींच्या झालेल्या कामांचे भूगतानासाठी रुपये ११८.१९ लक्षची देयके प्रलंबीत आहेत. तसेच सुरु झालेले परंतु मुल्यांकन न-झालेल्या विहीरींसाठी रुपये ११७.५० लक्ष निधी तसेच प्र.मा. प्राप्त सुरु न-झालेल्या ५७४ विहीरींसाठी रुपये १४३५.०० लक्ष व एकुण लक्षांक शिल्लक असलेल्या ५०१ विहीरींसाठी १२५२.५० लक्ष निधीची गरज भासेल.

तसेच सिंचन विहीरींचे कामावर असलेले तात्कालीन कंत्राटी अभियंता व डाटा एन्ट्री ऑपरेटर यांचे प्रलंबीत मानधन व इतर प्रशासकीय खर्चा करीता रुपये १५.१७ लक्ष निधीची आवश्यकता आहे.

उप जिल्हा जलसंधारण अधिकारी,
जिल्हा परिषद (ल.पा.) भंडारा.

Scanned by Scanner Go